# पोलीस अधीक्षक कार्यालय, अहिल्यानगर
## (आस्थापना शाखा)

दुरध्वनी क्र.०२४१ २४१६११३ फॅक्स क्र. ०२४१-२४१६१३३

www.ahmednagarpolice.org Email: sp.ahmednagar@mahapolice.gov.in





दि. ११/०३/२०२६

## पोलीस शिपाई भरती २०२४ - २०२५
## लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांकरीता मार्गदर्शक सुचना

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल आस्थापनेवर पोलीस शिपाई भरती-२०२४-२५ लेखी परिक्षेकरीता - पुरुष ७०२ व महिला २३२ असे एकूण ९३४ उमेदवार पात्र ठरलेले आहेत. पोलीस शिपाई भरती २०२४-२५ ची लेखी परीक्षा **दिनांक १५/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता न्यू कॉमर्स बिल्डिंग, न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, बॉईज हॉस्टेल गेट, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर** येथे घेण्यात येणार आहे

लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. यादीमध्ये नमुद उमेदवारांना लेखी परिक्षेचे हॉल तिकीट https://policerecruitment2025.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. उमेदवारांनी लेखी परिक्षेचे HALL TICKET संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन घ्यावेत. ज्या उमेदवारांना HALL TICKET डाउनलोड करता आले नाहीत त्यांनी MahaIT हेल्पलाईन नंबर - 022-61316418 किंवा mahapolicerecruitment.support@mahait.org या ईमेल आयडीवर संपर्क साधावा.

लेखी परीक्षेस उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी खालील सूचनांचे पालन करावे.

- **उमेदवारांनी काय करावे -**

1 उमेदवारांनी लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन त्यांची प्रिंट सोबत आणावी.

2 मैदानी चाचणीसाठी पात्र ठरविण्यात आलेले ओळखपत्र/प्रवेशपत्र तसेच 2 पासपोर्ट साईज फोटो सोबत आणावे.

3 वैध मुळ ओळखपत्र - (मतदान ओळखपत्र/पॅनकार्ड/आधारकार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स) सोबत आणावे.

4 उमेदवारांनी लेखी परिक्षा सुरु होण्याच्या किमान 02.00 तास आधी परिक्षा केंद्रात उपस्थित राहावे. (सकाळी 10.30 नंतर कोणत्याही उमेदवारास परिक्षाकेंद्रात प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.)

5 उमेदवारांची बैठक व्यवस्था त्यांच्या आवेदन अर्जावरिल सिट नंबर नुसार करण्यात येणार आहे.

6 परिक्षेसाठी पेन व पॅड पुरविण्यात येणार आहेत.

7 परिक्षेदरम्यान शिस्त व शांतता राखावी. परिक्षाकेंद्रावरिल पर्यवेक्षकांनी दिलेल्या सुचनांचे पालन करावे

- **उमेदवारांनी काय करु नये. -**

1 उमेदवारांनी मोबाईल, स्मार्ट वॉच/घडयाळ, कोणतेही इलेक्टॉनिक उपकरण परिक्षाकेंद्रात आणु नये.

2 कोणत्याही प्रकारचे दागिने परिधान करु नये.

3 कोणताही अनुचित प्रकार करु नये तसेच कोणाच्याही अमिषाला बळी पडू नये.

**परिक्षाकेंद्राचा पत्ता पहाण्यासाठी**
**सोबत नमुद QR Code स्कॅन करावा.**

**(सोमनाथ घार्गे )**
पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर.